**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८**

**अ प्रभाग समिती**

**सभावृत्तांत [कार्यपत्रिका क्रमांक ०5]**

दिनांक : 03/09/2019

वेळ : सकाळी 11.30 वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे **सप्टेंबर 2019 रोजी** ची मासिक सभा मंगळवार दिनांक **03/09/2019** रोजी सकाळी **11.30 वा.** अ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजमाता जिजाऊ सभागृह** " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा.शर्मिला राजू बाबर | सभापती |
| 2. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सदस्या |
| 3. | मा.केशव हनुमंत घोळवे | सदस्य |
| 4. | मा.तुषार रघुनाथ हिंगे | सदस्य |
| 5. | मा. शैलजा अविनाश मोरे | सदस्या / माजी उपमहापौर |
| 6. | मा. अमित राजेंद्र गावडे | सदस्य |
| 7. | मा.कांबळे राजेंद्र नामदेव | स्वीकृत सदस्य |
| 8. | मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू | महापालिका स्वीकृत सदस्य |

याशिवाय मा.श्रीमती आशादेवी दुरगुडे, क्षेत्रिय अधिकारी, मा. श्री ज्ञानदेव जुंधारे-कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.श्री. संजय खाबडे-कार्यकारी अभियंता विद्युत, मा.श्री प्रवीण लडकत-कार्यकारी अभियंता(पा.पु.), मा.श्री अनिल थेऊरकर, प्र.प्रशासन अधिकारी, मा.श्री मोहन निकम -लेखाधिकारी, मा.श्री महादेव शिंदे, सहाय्यक आरोग्याधिकारी, मा. श्री चंद्रकांत मुठाळ-उपअभियंता(स्थापत्य), मा.श्री शिवाजी चौरे-उपअभियंता(स्थापत्य), श्री नरोटे सुनिल-उपअभियंता(स्थापत्य उदयान) मा.श्री मोहन खोंद्रे उपअभियंता(झोनिपु स्थापत्य), श्रीमती मोमीन झेड.आय.-उपअभियंता(झोनिपु स्थापत्य),मा. श्री. एस.पी. काळे-उपअभियंता(ड्रेनेज), मा.श्री डी.एम.कुंभार-उपअभियंता(पाणी पुरवठा) मा.श्री पी.एम.गायकवाड-उद्यान अधिक्षक, श्री कोंढरे सुरेश-प्रशासन अधिकारी(अतिक्रमण),श्रीमती साळुंके अस्मिता-कनिष्ठ अभियंता-स्थापत्य उद्यान, श्री इनामदार एस.जी.-मुख्य आरोग्य निरिक्षक, श्री मुगुटराव सावंत-अतिक्रमण निरिक्षक, श्री ढगे राजेंद्र-अतिक्रमण निरिक्षक,श्री लांडगे सतिश-अतिक्रमण निरिक्षक, श्री जी.आर.गोसावी.-सहाय्यक उदयान अधिक्षक-उदयान विभाग,श्री डी.जी.कांबळे-उद्यान सहाय्यक, बैठकीस उपस्थित होते.

सर्वप्रथम मा. सभापती, शर्मिला राजू बाबर यांनी सर्व उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, अधिकारी यांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

---

त्यानंतर प्रस्तुत सभेमध्ये खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्रमांक१:-** सन्मा.सभापती शर्मिला राजू बाबर यांचा दिनांक ३१/०८/२०१९ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक 15 मधील गंगानगर परिसरातील सिसोदिया मार्केटजवळील चौकाचे नामकरण करणे आवश्यक आहे. तरी सदरचे चौकास सामाजिक कार्यकर्ते **"कै.पोपटराव बाबुराव मारणे (देशमुख)"** असे नामकरण करणेस मान्यता देणे.

**विषय क्रमांक२:-** सन्मा. सभापती शर्मिला राजू बाबर यांचा दिनांक ०३/०९/२०१९ रोजीचा प्रस्ताव.

प्र.क्र.१५ से.क्र.२७ मधील जानकी बन सोसायटी व कोरोमंट हाऊसिंग सोसायटी मधील मार्गाला **"कै.ज्ञानेश्वर धुंदाप्पा देवकुळे"** असे नामकरण करणेस मान्यता देणे.

**विषय क्रमांक ३:-** सन्मा. नामनिर्देशित सदस्य राजेंद्र नामदेव कांबळे यांचा दिनांक ०३/०९/२०१९ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १९ मधील रमाबाईनगर बौध्द् नगर,पिंपरी येथील प्रवेशद्वाराचे सुशोभिकरण करणेबाबत आर्किटेक्ट् नेमणेबाबत.

**विषय क्रमांक ४:-** सन्मा. सदस्य केशव घोळवे यांचा दिनांक ०३/०९/२०१९ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.१० मधील नागरी समस्या सोडविणेसंबंधी काही कामांना मंजूरी मिळणेबाबत. महात्मा फुले जेष्ठ् नागरिक संघ शाहूनगर यांना नुकतेच दिलेले विरंगुळा केंद्र येथे काही समस्या तसेच सुविधा देणेबाबत.

---

**सभेत खालीलप्रमाणे ठराव मंजूर करणेत आले.**

ठराव क्रमांक 13
दिनांक- 03/09/2019
सुचक: : मा.शर्मिला बाबर

विषय क्रमांक 1
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक मा. तुषार हिंगे

संदर्भ: सन्मा. सभापती शर्मिला राजू बाबर यांचा दिनांक ३१ ऑगष्ट् २०१९ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक 15 मधील गंगानगर परिसरातील सिसोदिया मार्केटजवळील चौकाचे नामकरण करणे आवश्यक आहे. तरी सदरचे चौकास सामाजिक कार्यकर्ते **"कै.पोपटराव बाबुराव मारणे (देशमुख)"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 14
दिनांक 03/09/2019
सुचक: मा. शर्मिला बाबर

विषय क्रमांक 2
विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. केशव घोळवे

संदर्भ:- सन्मा. सभापती शर्मिला राजू बाबर यांचा दिनांक ०३/०९/२०१९ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्र. १५ मधील से.क्र.२७ मधील जानकी बन सोसायटी व कोरोमंट हाऊसिंग सोसायटी मधील मार्गाला **"कै.ज्ञानेश्वर धुंदाप्पा देवकुळे"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 15
दिनांक 03/09/2019
सुचक: मा. तुषार हिंगे

विषय क्रमांक 3
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. केशव हनुमंत घोळवे

संदर्भ :- सन्मा.स्वीकृत नगरसदस्य् श्री राजेंद्र कांबळे यांचा दिनांक ०३/०९/२०१९ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १९मधील रमाबाईनगर व बौध्दग्र वस्तीमधील प्रवेशद्वाराचे सुशोभिकरण करणेकामी आर्किटेक्ट् नेमणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 16
दिनांक- 03/09/2019
सुचक: मा. केशव हनुमंत घोळवे

विषय क्रमांक 4
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. तुषार रघुनाथ हिंगे

संदर्भ: सन्मा. सदस्य केशव घोळवे यांचा दिनांक ३/९/२०१९ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.१० मधील नागरी समस्या सोडविणेबाबत काही कामांना मंजूरी मिळणेबाबत तसेच महात्मा फुले जेष्ठ् नागरिक संघ,शाहूनगर यांना नुकतेच दिलेले विरंगुळा केंद्र येथे काही समस्या असलेने तेथे खाली नमूद केलेप्रमाणे सुविधा उपलब्ध करुन देणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

- विरंगुळा केंद्र लिकेज आहे. ते लिकेज काढून लस्ट्र पेंट करुन एल.ई.डी लाईट्स व फॅन्स् बसविणे.
- जेष्ठ नागरिक संघ विरंगुळा केंद्रामध्ये इंटेरिअर आर्किटेक्टच्या मार्गदर्शनानुसार अंतर्गत एक केबिन,टेबल, खुर्च्या व फर्निचरमध्ये कपाटे बसवावीत.
- विरंगुळा केंद्रामध्ये टाईल्सवर कार्पेट बसविणे तसेच जेष्ठ नागरिकांचे मानसिक स्वास्थ्य् चांगले राहण्यासाठी म्युसिक सिस्टिम बसविणे, जेणेकरुन भावगीते,भक्तीगीते,राष्ट्रगीते, मन की बात व बातम्या ऐकतील.
- जेष्ठ् नागरिकांना सर्व माहिती मिळणेसाठी एल.सी.डी.टी. व्ही. कार्यालयामध्ये बसवून देणेत यावा.
- जेष्ठ् नागरिकांना केंद्र,राज्य्,मनपाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी तसेच परिसरातील नागरिकांच्या कल्याणकारी योजनांचा लाभ घेणेसाठी कॉम्प्युटर,प्रिंटर,स्कॅनर व संबंधित गेम्स्, ॲप्स् लोडिंग करुन देणेत यावे.
- जेष्ठ् नागरिक संघ कार्यालयामध्ये वॉटर प्युरिफायर, गरम व थंड पाण्याचे युनिट बसवून देणेत यावे(फिल्टर).
- जेष्ठ् नागरिक संघ कार्यालयामध्ये व्हेंटीलेशनसाठी एक्झॉस्ट् फॅन बसविणे.
- जेष्ठ् नागरिकांसाठी महिला व पुरुष कमोड टॉयलेट. वॉश बेसिन तयार करुन बसविणे तसेच मोठया साईजचा मिरर बसविणे.
- जेष्ठ् नागरिक संघ कार्यलयाबाहेर एक मोठे शु रॅक बसविणे.
- शिवमंदिर शाहूनगर येथील जुने शिवशंभो वाचनालय केबिन खराब झालेले असून मनपाने ते काढून टाकलेले आहे. तरी तिथे नव्योन व आकर्षक डिझाईनमध्ये शिवशंभो वाचनालय अद्ययावत केबिनसह बसविणे.
- शिवशंभो चौक येथील मुख्य चौकातील सुरक्षिततेची वॉल तुटलेली आहे, त्वरीत दुरुस्ती करणेत यावी.
- शाहूनगरमधील अंतर्गत रस्ते,मुख्य् रस्ते, के.एस.बी.चौक ते थरमॅक्स् चौक या मोठया रस्त्यालगतचे झाडांच्या फांद्यांची छाटणी करुन मिळावी.

<u>ठराव सर्वानुमते मंजुर झाला.</u>

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. सभापती- शर्मिला राजू बाबर, अ प्रभाग समिती यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी/अधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

{ शर्मिला राजू बाबर }
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्रमांक:- अक्षेका/9/कावि/ 125 /2019 दिनांक:- 11/09/2019

प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती, निगडी-44

प्रति,
सर्व संबंधित ------------------------